
# नागरिकांची सनद :

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

### प्रस्तावना :

- शासकीय परीक्षा घेण्यासाठी शासकीय परीक्षा मंडळाची स्थापना सन 1968 मध्ये करण्यात आली .
- शासकीय परीक्षा मंडळाचे रूपांतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद या स्वायत्त संस्थेत करण्याचे विधेयक डिसेंबर 1998 च्या विधिमंडळात मंजूर झाले.
- क्रमांक एसपीई 1099/37292/(254/99)/ साशि-1 महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अधिनियम 1998 मधील कलम 1 मधील उपकलम-3 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासनाने सदर अधिनियम संपूर्ण महाराष्ट्रात 15/08/2002 पासून लागू करण्यात आले.
- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष, आयुक्त, विभागीय अध्यक्ष, सहायक आयुक्त यांची कर्तव्य व अधिकार आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती विनियम, 2010, दि. 29 ऑक्टोबर 2010 च्या अधिसुचनेनुसार लागू करण्यात आले.
- शासन निर्णय दि. 07/12/2017 अन्वये परीक्षा परिषदेच्या विविध समित्यांमध्ये नामनिर्देशित सदस्यांचा समावेश करण्यात आला.
- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या समित्या - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अधिनियम 1998 नुसार राज्य समिती, कार्यकारी समिती, परीक्षा समिती, वित्त समिती,विद्या समिती इ. समित्यांमर्फत परीक्षा परिषदेचे कामकाज चालते. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाची अधिसूचना दि. 18/02/2020 अन्वये नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती रद्द झालेली असल्याने सद्यस्थितीत उपरोक्त नमूद सर्द समित्या बरखास्त झालेल्या आहेत व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे कामकाज राज्य परिषद समिती (तदर्थ समिती) मार्फत चालविण्यात येते.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
## (संस्था संरचना)



# ठळक वैशिष्टये

- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने विविध राज्यस्तरीय परीक्षांचे यशस्वी आयोजनविविध स्तरावरील अधिकारी यांचे सहकार्याने करण्यात येते.
- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणारे परीक्षांचे कामकाज आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करण्यात येते.
- सन 2024-25 या आर्थिक वर्षामध्ये परीक्षा फी व अप्रत्यक्ष जमा रुपये 113.53 कोटी जमा असून परीक्षांवर होणार खर्च व कार्यालयीन खर्च मिळून एकूण खर्च रुपये 59.13 कोटी इतका आलेला आहे व रु. ५४.४० कोटी रक्कम शिल्लक आहे.
- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान (वेतन व वेतनेतर बाबींकरीता) मिळत नसून परिषदेमार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांच्या परीक्षा शुल्कामधून प्राप्त होणाऱ्या जमा रकमेतून परिषदेचा सर्व खर्च (कार्यालयीन खर्चासहित) भागविला जातो.
- विविध परीक्षा संदर्भात लागणारी साधन सामग्री व सेवा या बाबींवर होणारा खर्च हा लेखासंहितानुसार व शासनाने वेळोवळी दिलेल्या वित्तीय नियमांनुसार केला जातो.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेत कार्यरत अधिकारी

| अ. क्र. | पदनाम | कार्यरत अधिकारी |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | डॉ. नंदकुमार बेडसे (भा. प्र. से.) |
| २ | आयुक्त | श्री. महेश चोथे |
| ३ | उपायुक्त | श्रीम. प्रिया शिंदे |
| ४ | उपायुक्त | श्रीम निशादेवी बंडगर |
| ५ | प्रशासन अधिकारी | श्री. कमलाकांत म्हेत्रे |
| ६ | सहायक आयुक्त | श्री. मारुती फडके |
| ७ | सहायक आयुक्त | श्री. शशिकांत चिमणे |
| ८ | सहायक आयुक्त | श्रीम. मेधा निरफराळे |
| ९ | कार्यक्रम संयोजक अधिकारी | श्री. हेमंत वाटाडे |
| १० | मूल्यमापन अधिकारी | श्री. संतोष जैन |
| ११ | अधीक्षक | श्रीम. सुजाता भगत |
| १२ | अधीक्षक | श्रीम. अर्चना सरदार |
| १३ | अधीक्षक | श्रीम. श्रद्धा वायदंडे |
| १४ | अधीक्षक | श्रीम. व्ही. एस. सोनकुसळे |
| १५ | लेखाधिकारी | श्री. विजय लांघे (प्रतिनियुक्तीने) |

# परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा

| अ. क्र. | परीक्षेचे नाव |
|---|---|
| १ | डी.टी.एड./डी.एल.एड. परीक्षा |
| २ | बाह्य परीक्षा |
| ३ | टीईटी परीक्षा |
| ४ | जीसीसी परीक्षा |
| ५ | जीसीसी - टीबीसी परीक्षा |
| ६ | एनटीएस परीक्षा |
| ७ | विभागीय परीक्षा |
| ८ | आर.आय.एम.सी. परीक्षा |
| ९ | पीएसई/यूपीएस परीक्षा |

## शाखेचे नावः एन. टी. एस. शाखा

### जोडपत्र-१

विभागाच्या / कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिध्द करावयाचा योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभाग- एन. टी. एस.

| अ.क्र. | योजनेचे / परीक्षेचे नाव | योजना मंजूर करण्याची कालमर्यादा (कार्य दिवसामध्ये | योजना मंजूर करणारे प्राधिकरण / अधिकारी | विलंब झाल्यास तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) | सदर योजना ही केंद्र शासनाची आहे. वर्षातून एकदा होते. डिसेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवडयात घेण्यात येते. | शिक्षण मंत्रालय (MoE), भारत सरकार, नवी दिल्ली<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सदर परीक्षेचे आयोजन केले जाते. परिषदेचे सक्षम अधिकारी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | शिक्षण मंत्रालय (MoE), भारत सरकार, नवी दिल्ली व मा. शिक्षण संचालक (योजना), शिक्षण संचालनालय, पुणे-01<br>परिषदेच्या स्तरावर 1) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>2) मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |
| 2 | राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून प्रवेशपात्रता परीक्षा (RIMC) | सदर योजना ही राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून यांची आहे.वर्षातून दोनदा होते. जून व डिसेंबर | राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सदर परीक्षेचे आयोजन केले जाते. परिषदेचे सक्षम अधिकारी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | मा. कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून<br>परिषदेच्या स्तरावर 1) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>2) मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |

## जोडपत्र-१

### विभागाच्या / कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिध्द करावयाचा योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभाग- डी.एल.एड्. विभाग

| अ.क्र. | योजनेचे / परीक्षेचे नाव | योजना मंजूर करण्याची कालमर्यादा (कार्य दिवसामध्ये | योजना मंजूर करणारे प्राधिकरण / अधिकारी | विलंब झाल्यास तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा (डी.एल.एड) | प्रति वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची वर्षातून दोन वेळा जून (नियमित) व नोव्हेंबर (पुनर्परीक्षा) घेण्यात येते. | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय पुणे-०१ |

## जोडपत्र - १

### विभागाच्या / कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिध्द करावयाचा योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभागाचे / कार्यालयाचे नाव

जीसीसी प्रशासन शाखा

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजना मंजूरकरण्याचीकालमर्यादा (कार्य दिवसामध्ये) | योजना मंजूरकरणारे प्राधिकरण / अधिकारी | विलंब झाल्यास तक्रार दाखलकरण्यासाठी संबंधित अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीयसंगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा | वर्षातून दोन वेळा परीक्षेचे आयोजनकेले जाते. (जुन/जुलै) (नोव्हेंबर/डिसेंबर) एक सत्र - सहा महिने कालावधी | मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे | मा.आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे |
| २ | शासकीयसंगणक लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा | वर्षातून दोन वेळा परीक्षेचे आयोजनकेले जाते. (जून/जुलै) (नोव्हेंबर/डिसेंबर) एक सत्र - सहा महिने कालावधी | मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे | मा.आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे |

**जोडपत्र-१**

**विभागाच्या /कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिद्ध करावयाचा योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमूना.**

**विभाग : वाह्य परीक्षा विभाग**

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजना मंजूरकरण्याचीकालमर्यादा (कार्य दिवसांमध्ये) | योजना मंजूरकरणारे प्राधिकारी/अधिकारी | विलंब झाल्यास तक्रार दाखलकरण्यासाठी संबंधित अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) | शासननिर्णय दिनांक 13.02.2013 व दिनांक 23.08.2013 अन्वये प्राथमिक शिक्षकांकरीतासदर परीक्षेचे वर्षातुन एकदा आयोजनकेले जात होते. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक 01.09.2025 रोजीच्या निर्देशानुसार व आदिवासी विकास विभागाच्या दिनांक 1 जानेवारी 2026 च्या शासननिर्णया नुसार प्राथमिक शिक्षकांकरिता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आणि शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य केली असून, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दि. 29 मे 2026 रोजीच्या निर्णयानुसार शिक्षक पात्रता परीक्षा (TET) परीक्षेचे<br>**साधारणतः वर्षातुन दोन वेळा घेणेबाबत निर्देश प्राप्त आहेत.** | मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र |

जोडपत्र - १

## विभागाच्या / कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिद्ध करावयाच्या योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

**विभागाचे नाव - शिष्यवृत्ती विभाग**

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजना मंजूर करण्याची कालमर्यादा (कार्य दिवसांमध्ये) | योजना मंजूर करणारे प्राधिकरण / अधिकारी | विलंब झाल्यास तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) | मा. शिक्षण संचालक, (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे | मा. शिक्षण संचालक, (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे | १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>२. मा. शिक्षण संचालक, (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे |
| २ | उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी) | | | |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे मार्फत शासन निर्णय दि. १७/१०/२०२५ अन्वये प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी) चे आयोजन साधारणतः दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या रविवारी घेण्यात येते. नियमितपणे दरवर्षी एकदा घेण्यात येणारी ही परीक्षा आहे . तरी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करणे सदर बाब "योजना" नाही. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रकमेचे वाटप करणे ही "योजना" असून ती मा.शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयामार्फत राबविण्यात येते. सन २०२५-२६ साठी साधारणता एकूण ११,५६,७४४ विद्यार्थ्यांनी आवेदनपत्र भरले आहे. सदर परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती धारक ठरल्यास शिष्यवृत्ती च्या स्वरुपात आर्थिक सहाय्य मिळते. तसेच गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यान अभ्यासाची गोडी निर्माण होऊन प्रोत्साहन मिळते.

## जोडपत्र-२

### संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

### विभाग- एन. टी. एस.

### योजना : राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS)

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| 1 | योजनेचा संक्षिप्त तपशील | 1) केंद्रशासनामार्फत (शिक्षण मंत्रालय (MoE), भारत सरकार, नवी दिल्ली) 2007-08 पासून आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी सदरची परीक्षा इ. 8 वी साठी सर्व राज्यांसाठी सुरु केली आहे. प्रत्येक राज्य हे आपल्या नियोजना प्रमाणे परीक्षेचे आयोजन करते.<br>2) इयत्ता 8 वीच्या अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक सहाय्य करणे.<br>3) विद्यार्थ्यांचे उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण घेण्यास मदत करणे.<br>4) विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता विकसित होऊन त्या विद्यार्थ्यांकडून आपली विद्याशाखा व राष्ट्र यांची सेवा घडावी. |
| 2 | योजनेच्या पात्रतेचे निकष | 1) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासकीय, शासनमान्य अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील इयत्ता 8 वी मध्ये शिकत असलेल्या आणि खालील अटी पूर्ण करणाऱ्या नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनीस या परीक्षेस बसता येते.<br>2) पालकांचे (आई व वडील दोघांचे मिळून) वार्षिक उत्पन्न 3,50,000/- पेक्षा कमी असावे.<br>3) विद्यार्थी/विद्यार्थ्यीनी इ.7 वी मध्ये किमान 55% गुण मिळवून उत्तीर्ण झालेला असावा. (अनुसूचीत जाती (SC)/अनुसूचित जमाती (ST) चा विद्यार्थी किमान 50% गुण मिळवून उत्तीर्ण झालेला असावा.) |
| 3 | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | 1) पालकांचे (आई व वडील दोघांचे मिळून)तसेच नोकरीत असलेल्या पालकांनी आपल्या आस्थापनाप्रमुखांचा व इतरांनी तहसिलदारांचा/तलाठयांचा आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला<br>2) जातीचे प्रमाणपत्र<br>3) दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र<br>4) इ. 7 वी चे गुणपत्र |
| 4 | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | https://mscepune.in/ व https://mscenmms.in/ |
| 5 | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | 1) शाळा संलग्नता शुल्क रु. 200/- प्रती शाळा<br>2) विद्यार्थी आवेदनपत्र शुल्क रु. 120/- प्रती विद्यार्थी |
| 6 | शुल्क भरण्याची पद्धत | ऑनलाईन |
| 7 | योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी | सदर योजना ही केंद्र शासनाची आहे. |
| 8 | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | शिक्षण मंत्रालय (MoE), भारत सरकार, नवी दिल्ली व मा. शिक्षण संचालक (योजना), शिक्षण संचालनालय, पुणे-01 यांचेमार्फत योजना मंजूर केली जाते.<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सदर परीक्षेचे आयोजन केले जाते. परिषदेचे सक्षम अधिकारी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |
| 9 | योजनेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | शिक्षण मंत्रालय (MoE), भारत सरकार, नवी दिल्ली व मा. शिक्षण संचालक (योजना), शिक्षण संचालनालय, पुणे-01.<br>परिषदेच्या स्तरावर 1) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>2) मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |

जोडपत्र-२

संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभाग- एन. टी. एस.

योजना : राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून प्रवेशपात्रता परीक्षा (RIMC)

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| 1 | योजनेचा संक्षिप्त तपशील | 1) राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (RIMC) ही राष्ट्रीय स्तरावरील संस्था असून येथील प्रशिक्षणार्थींना उच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जाते.<br>2) विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण झाल्यावर भारतीय सैनिक सेवेत भरती होऊन सैनिकी अधिकारी प्रशिक्षणासाठी निवड करणे हा सदर योजनेचा उद्देश आहे. |
| 2 | योजनेच्या पात्रतेचे निकष | विद्यार्थी / विद्यार्थीनी (उमेदवार) प्रवेशाच्या वेळी कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेमध्ये इयत्ता 7 वी वर्गात शिकत असावा किंवा 7 वी उत्तीर्ण झालेला असावा. तसेच या परीक्षेसाठी विद्यार्थी / विद्यार्थीनीचे वयोमर्यादा (वय) प्रवेशाच्या वेळी $11^{1/2}$ (अकरा वर्ष सहा महिने) पेक्षा कमी आणि 13 (तेरा) वर्षांपेक्षा अधिक नसावे. |
| 3 | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | 1) जन्म दाखल्याची छायाप्रत (राजपत्रित अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली झेरॉक्स कॉपी)<br>2) उमेदवाराचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) प्रमाणपत्र छायाप्रत (राजपत्रित अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली झेरॉक्स कॉपी)<br>3) अनुसूचित जाती/जमातीसाठी जातीच्या दाखल्याची छायाप्रत (झेरॉक्स कॉपी).<br>4) विद्यार्थ्यांचा फोटो, जन्मतारीख व इयत्तेच्या नोंदीसह शाळेच्या बोनाफाईड सर्टिफिकेटची मूळ प्रत फोटोसह मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने जोडणे आवश्यक आहे.<br>5) आवेदनपत्रासोबत विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे (उमेदवाराचे) आधारकार्ड छायाप्रत (झेरॉक्स कॉपी) जोडणे. बंधनकारक आहे आणि ते जमा न केल्यास विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे (उमेदवाराचे) आवेदनपत्र (फॉर्म) रद्द करण्यात येईल.<br>6) विद्यार्थ्यांचे दोन पासपोर्ट आकाराचे फोटो (मागील बाजूस विद्यार्थ्यांच्या सहीसह) |
| 4 | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | https://rimc.edu.in/rimc-index.aspx |
| 5 | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | रु. 600/- व अनुसूचित जाती/जमाती करीता रु. 555/- पैसे भरून आवेदनपत्राची (फॉर्मची) मागणी करता येईल. |
| 6 | शुल्क भरण्याची पद्धत | ऑनलाईन व डिमांड ड्राफ्ट द्वारे |
| 7 | योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी | सदर योजना ही राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून यांची आहे. परीक्षा वर्षातून जून व डिसेंबर अशी दोनदा घेतली जाते. |
| 8 | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | मा. कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून<br>परिषदेच्या स्तरावर 1) मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |
| 9 | योजनेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | मा. कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून<br>परिषदेच्या स्तरावर 1) मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |

## जोडपत्र-२

### संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभाग- डी.टी.एड विभाग

**योजना : प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा (डी.एल.एड्.)**

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| 1 | योजनेचा संक्षिप्त तपशील | प्रति वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची वर्षातून दोन वेळा जून (नियमित) व नोव्हेंबर (पुनर्परीक्षा) घेण्यात येते. प्रथम वर्ष,एकूण विषय - 8, द्वितीय वर्ष एकूण विषय- 8 डी.एल.एड परीक्षा मराठी , इंग्रजी , हिंदी , उर्दु , कन्नड या पाच माध्यमांमध्ये घेतली जाते. |
| 2 | योजनेच्या पात्रतेचे निकष | 1) उपस्थिती :- प्रथम आणि द्वितीय वर्ष अखेरीस होणाऱ्या लेखी परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी 80% उपस्थिती आवश्यक असेल.<br>2) दोन्ही वर्षीच्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान 50% गुण मिळविणे बंधनकारक आहे, तथापि एखाद्या छात्राध्यापक प्रथम वर्षाच्या लेखी परीक्षेत सर्व विषयात जरी अनुत्तीर्ण झाला तरी द्वितीय वर्षात प्रविष्ठ होण्यास पात्र होईल.<br>3) लेखी परीक्षेत अपेक्षित गुण (प्रत्येक विषयात किमान 50% गुण ) न मिळाल्यास माहे ऑक्टोबर मध्ये होणाऱ्या पुरवणी परीक्षेत छात्राध्यापकाला बसता येईल.<br>4.) प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे. तथापि प्रवेश घेतलेल्या तारखेपासून जास्तीत जास्त तीन वर्षाच्या कालावधीत छात्राध्यापकास प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम (D. El.Ed.) उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल. अन्यथा त्यास पुनर्पवेश घ्यावा लागेल. 5) प्रत्येक वर्षातील आकारिक मूल्यमापन वेळेत पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी विद्यालयाची व संबंधित छात्राध्यापकाची आहे.द्वितीय वर्षाच्या अखेरीस छात्राध्यापकाने दोन्ही वर्षाचे आकारिक मूल्यमापन पूर्ण केले नाही तर तो अनुत्तीर्ण समजण्यात येईल. 6) प्रत्येक विषयात (लेखी + आकारिक ) किमान 50% गुण किंवा क श्रेणी प्राप्त करणारे छात्राध्यापक उत्तीर्ण समजण्यात येतील. |
| 3 | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | गुणपत्रक, प्रमाणत्र व स्थलांतर प्रमाणपत्र |
| 4 | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | https:/deledexam.in |
| 5 | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | 1) अध्यापक विद्यालय संलग्नता शुल्क रु. 2000/-<br>2) विद्यार्थी नोंदणी शुल्क शुल्क रु. 120/- प्रती विद्यार्थी 3) परीक्षा शुल्क रु. 150 प्रती विषय |
| 6 | शुल्क भरण्याची पद्धत | ऑनलाईन |
| 7 | योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी | सदर योजना ही केंद्र शासनाची आहे. |
| 8 | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |
| 9 | योजनेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | आयुक्त शिक्षण शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे |

**जोडपत्र - २**

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना**

**विभागाचे / कार्यालयाचे नाव - जीसीसी प्रशासन शाखा**

**योजनेचे नाव**

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचासंक्षिप्ततपशील | महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासन निर्णय दि. २७/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन,लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ च्या सुधारित नियमावली २०२३ नुसार शासकीयसंगणक टंकलेखन परीक्षा व शासन निर्णय दि.२०/०८/२०२४ अन्वये शासकीयसंगणक लघुलेखन परीक्षेचे आयोजनकरण्यात येते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेमार्फत वर्षातून दोनवेळा (जून/जुलै व नोव्हेबर/डिसेंबर) सदर परीक्षांचे आयोजनकरण्यात येते. |
| २ | योजनेच्या पात्रतेचे निकष | १० वी उत्तीर्ण |
| ३ | योजनेसाठी आवश्यककागदपत्रे | १० वी उत्तीर्ण प्रमाणपत्र व आधारकार्ड |
| ४ | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | www.mscepune.in |
| ५ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | ११००/- प्रति विदयार्थी , प्रति विषय |
| ६ | शुल्क भरण्याची पध्दत | ऑनलाईन |
| ७ | योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी | - |
| ८ | योजना मंजूरकरणारेसक्षम प्राधिकारी | मा.अध्यक्ष<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे |
| ९ | योनजेसंदर्भात तक्रार निराकरणकरणारे अधिकारी | मा.आयुक्त<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे |

## जोडपत्र-२

### विभाग : बाह्य परीक्षा विभाग

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| 1 | योजनेचा संक्षिप्त तपशील | ➢ महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET)<br>राज्यातील प्राथमिक शिक्षकांकरिता (इ. 1 लीते 8 वी) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दिनांक 13.02.2013 च्या शासननिर्णयाद्वारे निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षकांकरिता (इ. 1 लीते 8 वी) शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य केलेली आहे. तसेच, दिनांक 23.08.2013 च्या शासननिर्णयानुसार सन 2013 पासून शिक्षक पात्रता परीक्षा (Teacher Eligibility Test - TET) आयोजनकरण्याची सर्व जबाबदारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.सदर परीक्षा मराठी, इंग्रजी, उर्दु, बंगाली, हिंदी, सिंधी, गुजराती, कन्नड, व तेलगू अशा नऊ माध्यमातुन ऑफलाईन पद्धतीने आयोजित केली जाते. |
| 2 | योजनेच्या पात्रतेचे निकष | ➢ महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET)<br>पेपर I (इ. 1 लीते इ. 5 वी) - डी.टी.एड किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण<br>पेपर II (इ. 6 वी ते इ. 8 वी) - पदवी व डी.टी.एड/बी.एड किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| 3 | योजनेसाठी आवश्यककागदपत्रे | ➢ महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET)<br>गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| 4 | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | www.mscepune.in |
| 5 | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | ➢ महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET)<br>पेपर I किंवा II साठी सर्वसाधारण, इ.मा.व., विमाप्र, व विजाभज रु. 1000/-<br>पेपर I व II साठी 1200/-<br>पेपर I किंवा II साठी अनु. जाती, अनु. जमाती व दिव्यांग रु. 700/-<br>पेपर I व II साठी 900/- |
| 6 | शुल्क भरण्याची पद्धत | ऑनलाईन स्वरुपात |
| 7 | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | परीक्षा पूर्व व परीक्षोत्तरकामकाजासाठीसाधारणत: 6 महिने कालावधी. |
| 8 | योजना मंजूरकरणारेसक्षम प्राधिकारी | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे |
| 9 | योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे । |

## जोडपत्र-२

### विभागाचे नाव - शिष्यवृत्ती विभाग

### योजनेचे नाव - प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ७ वी)

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचा संक्षिप्त तपशील | १. राज्यातील गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तसेच स्पर्धात्मकतेसाठी प्रोत्साहित करणे.<br>२. राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील गरीब, होतकरू, हुशार व प्रज्ञावान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे व त्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे आणि त्यांचा आदर्श घेऊन इतर विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागावी या उद्देशाने खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्याची योजना सन १९५४-५५ पासून कार्यान्वित असून त्यानुसार शिष्यवृत्ती परीक्षेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. |
| २ | योजनेच्या पात्रतेचे निकष | १) विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>२) विद्यार्थी शासनमान्य शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित शाळेत इयत्ता ४ थी किंवा इयत्ता ७ वीत शिकत असावा. |
| ३ | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | १. विद्यार्थ्यांची फोटो<br>२. विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक / आधार ENROLLMENT NO.<br>३. विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र (SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D)<br>४. विदर्भातील ११ जिल्ह्यातील पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पेक्षा कमी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे (तलाठी तहसीलदार/ प्रांत अधिकारी) प्रमाणपत्र. (इ. ४ थी व इ. ७ वीसाठी)<br>५. विद्यार्थ्यांचे पालक रु.१,००,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणारे भूमिहीन शेतमजूर असल्यास भूमिहीन शेतमजूर व रू.१,००,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असल्याबाबत सक्षम अधिकारी (तलाठी / तहसीलदार / प्रांत अधिकारी) यांनी दिलेली प्रमाणपत्रे. (इ. ७ वीसाठी)<br>६. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या फोटोसह स्वाक्षरीची एकत्रित स्कॅन कॉपी. |
| ४ | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | https://puppssmsce.in/ व http://www.mscepune.in/ |
| ५ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | बिगरमागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी -<br>प्रवेश शुल्क रु. ०५०/-<br>परीक्षा शुल्क रु. १५०/-<br>एकूण रु. २००/-<br>अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, भटक्या जाती-विमुक्त जमातीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी -<br>प्रवेश शुल्क रु. ०५०/-<br>परीक्षा शुल्क रु. ०७५/-<br>एकूण रु. १२५/-<br>याशिवाय प्रत्येक सहभागी शाळेला प्रतिवर्षी रु. २००/- शाळा संलग्नता शुल्क |
| ६ | शुल्क भरण्याची पद्धत | ऑनलाईन |
| ७ | योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी | शिष्यवृत्ती रकमेच्या वितरणाचे कामकाज हे मा. शिक्षण संचालक, (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाकडून केले जाते. |
| ८ | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | शिष्यवृत्ती रकमेच्या वितरणाचे कामकाज हे मा. शिक्षण संचालक, (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाकडून केले जाते. |
| ९ | योजनेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>२. मा. मा. शिक्षण संचालक, (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे<br>३. परिषदस्तर - मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे. |

## सूचना फलक
## (महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५)

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार अधिसूचित केलेल्या सेवांबाबत तपशिल

**कार्यालयाचे नाव :- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे** **विभाग :- डी. एल. एड विभाग व जी. सी. सी विभाग**

| अ.क्र. | अधिसूचित लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | द्वितीय अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | डी.एल.एड्. विभाग गुणपत्रक, प्रमाणपत्र द्वितीय प्रत | 15 दिवस | 500 | अधीक्षक | सहायक आयुक्त | आयुक्त |
| 2 | जी. सी. सी विभाग नाव दुरुस्ती प्रमाणपत्र | 15 दिवस | 500 | अधीक्षक | सहायक आयुक्त | आयुक्त |
| 3 | जी. सी. सी विभाग दुय्यम प्रमाणपत्र | 15 दिवस | 500 | अधीक्षक | सहायक आयुक्त | आयुक्त |
| 4 | जी. सी. सी विभाग नवीन संस्था संलग्नता देणे. | 15 दिवस | - | अधीक्षक | सहायक आयुक्त | आयुक्त |

तृतीय व अंतिम अपिल राज्य आयुक्त, लोकसेवा हक्क आयोग, पुणे महसूल विभाग, पुणे यांचेकडे करता येईल. आयोगाच्या कार्यालयाचा ई-मेल आयडी व दुरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

**ई-मेल- crtspune@maharashtra.gov.in**

दूरध्वनी क्र. 020-29950663

संकेतस्थळ - https://aaplesarkar.mahaonline.gov.in

आयुक्त
कार्यालय प्रमुख
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
पुणे-१.